REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.2331(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 10 | JULY - 2018

# देवबंद चळवळ : चिकित्सक अभ्यास

**डॉ.तुकाराम नारायण शिंदे**
इतिहास विभाग , अे.आर.बुर्ला महिला महाविदयालय,सोलापूर




**प्रस्तावना :**

भारतात मध्ययुगात इस्लाम सत्ता स्थापन झाली होती. हिन्दु लोक त्यांची प्रजा होती. इस्लाम सत्तेच्या ऱ्हासानंतर ब्रिटीश सत्ता भारतात स्थापन झाली.तेव्हा हिन्दुबरोबर मुसलमानही ब्रिटीश राज्यातील प्रजाजन बनले. परंतु भारतात आपण सत्ताधीश होतो. तेव्हा भारतात पुन्हा इस्लाम सत्ता स्थापन झाली पाहिजे असा प्रयत्न १८५७ च्या उठावात मुसलमानांनी केला. परंतु ब्रिटीशांनी हा उठाव मोडून काढला.१८५७ च्या उठावाला मुसलमानांना जबाबदार धरुन त्यांच्याशी ब्रिटीश कठोरपणे वागले.पण लवकरच मुसलमानाशी कठोरपणे वागून शांततेत राज्य करता येणार नाही हे ब्रिटीशांनी ओळखले आणि त्यांनी मुसलमानाबाबतचे धोरण १८० कोनात बदलले. त्यानुसार मुसलमानांना खुष करण्याचे धोरण स्वीकारले.मुसलमानांनी याचा उपयोग स्वतंत्र इस्लाम राज्य निर्मितीसाठी करुन घेतला.मुसलमानांनी यासाठी अनेक संस्था स्थापन केल्या होत्या.त्यापैकीच देवबंद ही संस्था आणि या संस्थेमधून सुरु झालेली देवबंद चळवळ ही एक होती.प्रस्तुत शोधनिंबधात या देवबंद चळवळीचा आढावा घेतला आहे.

## १. देवबंद इस्लाम विदयापीठाची स्थापना

इ.स. १८५७ च्या उठावानंतर इस्लाम राज्य स्थापन करण्यासाठी मुसलमांनाच्या अनेक संस्था स्थापन झाल्या होत्या.त्यापैकीच देवबंद ही संस्था होती.देवबंद हे एक शहर असून ते उत्तर प्रदेशातील मुज्जफरनगर जिल्हयात व दिल्लीपासून ११० कि.मी. अंतरावर आहे.[१] देवबंद येथे मौ.रसीद अहमद यांनी हाजी इमादुल्लाह यांच्या प्रेरणेतून दार-उल-उलुम सुरु केले होते. म्हणजेच इस्लाम विदयापीठ सुरु केले होते. ही शिक्षणसंस्था नावलौकिकाला पोहोचविण्यात मौ.मुहमंद कासीम नानौतवी यांचा सिंहाचा वाटा होता. तेच या संस्थेचे मार्गदर्शक व प्रेरणास्थान होते.[२] देवबंदने राजकीय, धार्मिक व सांस्कृतिक स्वातंत्र्यासाठी शांततापूर्ण मार्गाचा अवलंब केला होता. त्याचबरोबर या ध्येयपूर्तीसाठी देवबंद येथे व्यक्ती निर्माण करण्याचे कार्य चालू झाले होते.

## २. देवबंद चळवळ

देवबंदच्या दार-उल-उलुमच्या विचारातून देवबंद चळवळ सुरु झाली होती. इ.स.१८८५ ते १९४७ या काळात भारतीय स्वातंत्र्यलढा व पाकिस्तान निर्मितीच्या काळात मुस्लिम समाज अलिगड चळवळ व देवबंद चळवळ या दोन चळवळीत विभागला होता. देवबंद चळवळीचा पाश्चात्त्य शिक्षणाला सशर्त विरोध होता. या चळवळीचे नेते उलेमा, मौलवी, धर्मपंडित हे परंपरावादी धर्मनिष्ठ विचाराचे होते. त्यांना धर्मशिक्षणातून सच्चे मुसलमान बनवायचे होते. विदयार्थ्यांना इस्लामनिष्ठ बनवून ब्रिटीशद्रोही बनवायचे होते. इस्लामी राज्य स्थापनण्यासाठी प्राणार्पण करणारे धर्मयोध्दे निर्माण करण्यावर त्यांचा भर होता. इ.स.१८५७च्या उठावात भाग घेतलेले अनेक योध्दे देवबंद विदयापीठात अध्यापक होते.[३]

## ३. देवबंद- राष्ट्रवादी मुसलमानांचा प्रवाह

देवबंद चळवळीने विदयार्थ्यांना ब्रिटीशद्रोही बनवण्यावर भर दिला होता. इतकेच नव्हे तर ब्रिटीशविरोधी सशस्त्र क्रांतीची योजना आखली होती.देवबंद चळवळीतून जमियत-उल -उलेमा-हिन्द हा राजकीय पक्ष जन्मास आला होता. देवबंद चळवळ हिन्दु-मुस्लिम ऐक्य, भारतीय राष्ट्रवाद,अखंड भारत या बाजूने होती. तसेच देवबंद चळवळ काँग्रेसच्या बाजूने होती. यासर्व स्थितीमुळेच देवबंद चळवळीला किंवा देवबंद धर्मनिष्ठ मुसलमानांना ब्रिटीशविरोधी ,स्वातंत्र्यवादी,ऐक्यवादी,राष्ट्रवादी व काँग्रेस व हिन्दुच्या बाजूचे मानले जाते.[४] यासर्व स्थितीमुळेच देवबंद चळवळ मुसलमानातील राष्ट्रवादी प्रवाहाचा एक भाग मानली जाते.

### ४. देवबंद चळवळ -इस्लामी पुनरुज्जीवनाचे केंद्र

देवबंद शहर उत्तर प्रदेशातील मुस्लिम संस्कृतीच्या हृदयस्थानी वसलेले होते. देवबंद शहर इस्लामी संस्कृतीचे केंद्र होते.[५] देवबंद येथे इ.स.१८६७ मध्ये दार-उल-उलुम (मदरसा) या इस्लाम विदयापीठाची स्थापना झाली होती. या विदयापीठाच्या व्यवस्थापनासाठी सात जणांचे सल्लागार मंडळ ( मजलीस-इ-शूरा) स्थापन झाले होते.या मंडळातील सर्वजण वलिउल्लाही परंपरेचे मौलवी होते.[६] उत्तर प्रदेशात या संस्थेकडून इ.स.१८९९ पर्यंत किमान तीस मदरसे स्थापन करण्यात आले होते. जनतेला धर्मविषयक प्रश्नावर मार्गदर्शन करण्यासाठी धर्मादेश केंद्र (दार-उल-फित्र) स्थापन करण्यात आले होते. पुढे लवकरच भारतीय मुसलमानांच्या धार्मिक विषयासंबंधीचे ते अधिकृत मार्गदर्शन केंद्र बनले होते. सरकारकडून मदत घ्यायची नाही हे देवबंदचे तत्व होते. त्यामुळे येथील मदरसे लोकांनी दिलेल्या देणगीतून चालत होते. देवबंदचे उलेमा व मौलवी धार्मिक व राष्ट्रीय विचारवंत होते. देवबंदची विचारसरणी कडवी धार्मिक व हनाफी परंपरेची होती.[७] देवबंदला इस्लामचे शुध्दीकरण करायचे होते. या सर्व स्थितीमुळेच देवबंद इस्लामी पुनरुज्जीवन चळवळीचे केंद्र बनले होते.

### ५. देवबंद चळवळीचे हिन्दुशी सहकार्याचे धोरण

मौ.नानौतवीच्या मृत्यूनंतर म्हणजे इ.स. १८८० नंतर मौ.रशीद अहमद गंगोही हे दार-उल-उलुमचे प्रमुख बनले होते. ते कडवे परंपरावादी पण व्यवहारी होते. इ.स.१८८५ मध्ये अखिल भारतीय राष्ट्रीय सभेची /काँग्रेसची स्थापना झाली होती.तेव्हा मुसलमानांनी राष्ट्रीय सभेशी संबंध ठेवायचा की नाही हा प्रश्न निर्माण झाला होता. अलिगडचे सर सय्यद अहमद खान असे काँग्रेसशी संबंध ठेवण्याच्या विरोधी होती. अशावेळी मौ. गंगोही यांनी राष्ट्रीय सभेशी सहकार्य ठेवण्याची भूमिका घेतली. त्यांनी घोषित केले होते की, “ इहलौकिक विषयासंबंधात मुसलमानांनी काँग्रेसशी संबंध ठेवणे व सहकार्य करणे धर्मानुसार अनुज्ञेय आहे. फक्त इस्लामच्या कोणत्याही मुलभूत तत्वांचा भंग होता कामा नये.”[८] स्वातंत्र्यचळवळीत हिन्दुच्या सहकार्याशिवाय यश मिळणे शक्य नाही याची त्यांना जाणीव होती. थोडक्यात पुरेशा सामर्थ्याच्या अभावी प्राप्त परिस्थितीत शरियतच्या अधीन राहून मुसलमानांनी काँग्रेस व हिन्दुशी संबंध ठेवण्यास हरकत नाही. अशीच भूमिका देवबंदने घेतली होती. यामुळेच देवबंद चळवळ ब्रिटीशविरोधी व काँग्रेसच्या बाजूने पण काँग्रेसपेक्षा अधिक स्वातंत्र्यवादी ठरली.

### ६. देवबंदची सशस्त्र क्रांतीची योजना

इ.स. १९०५ मध्ये मौलवी गंगोही यांचे निधन झाले तेव्हा मौ. महमूद हसन यांच्याकडे देवबंद शिक्षण संस्थेची धुरा आली. मौ.हसन हे देवबंदचे पहिले विदयार्थी होते. इ.स. १८९० पासून ते दार-उल-उलुमचे प्राचार्य होते. त्यांनी शिक्षणाबरोबरच राजकीय कार्यही सुरु केले होते. ब्रिटीशांचे राज्य उलथून टाकणे आणि शरियतनुसार राज्य करणे या ध्येयासाठी त्यांनी सशस्त्र क्रांतीची योजना आखली होती. भारतीय मुसलमानांना भारतातील हिन्दुपेक्षा बाहेरील मुस्लिम देशच जवळचे वाटत होते. इ.स.१८५७ मध्ये दिल्लीच्या बहादूरशहाने पर्शियाच्या शाहला भारतावर आक्रमण करण्यासाठी निमंत्रण दिले होते. तर भारतीय मुसलमान आपले भवितव्य घडविण्यासाठी ईजिप्तकडे मुक्तिदाता म्हणून पाहत होते. याबाबत इतिहासकार मुजुमदार यांनी म्हटले आहे की, भारतीय मुसलमानांना सतत वाटत आले आहे की, आपल्या शेजारी हिन्दुपेक्षा मुसलमान आपल्याला अधिक जवळचे आहेत. ही भावनाच राष्ट्रवादाच्या मुळावर प्रहार करणारी होती.[९] मौ.महमूद हसन हा ही अफगाणिस्तानचा अमीर अहमदशाह अब्दालीने भारतातील मुसलमानांना मदत करण्यासाठी ब्रिटीश भारतावर आक्रमण करण्याबाबत आग्रही होता. अर्थात ही सशस्त्र क्रांतीची योजना ही योजनाच राहिली.तरी इ.स.१८५७ च्या उठावानंतर ब्रिटीशविरोधी सशस्त्र क्रांतीची योजना निःसंदिग्धपणे देवबंदच्या उलेमांनी आखली होती. याबाबत प्रा.फक्रुद्दीन बेन्नूर म्हणतात की, “ हिन्दुस्थानच्या स्वातंत्र्यलढयातील सशस्त्र क्रांतीची सुरुवात मुस्लिम क्रांतिकारकापासूनच होते. तसे पाहिल्यास ब्रिटीशविरुध्द लढयाची सुरुवात मुस्लिम क्रांतीकारकांनीच केलेली होती. पण हा इतिहास लोकांसमोर आणला गेलाच नाही.”[१०] अर्थात मुसलमानांचा हा प्रयत्न इस्लाम राज्य स्थापनेसाठी होता.हेही विसरता येणार नाही.

### सारांश

ब्रिटीश काळातील मुसलमानांना भारताच्या स्वातंत्र्यापेक्षा इस्लाम राज्य स्थापन करण्यात आणि तेथे शरियतनुसार राज्य करण्यातच अधिक रस होता. हिन्दुवर त्यांचा विश्वास नव्हता.पण सामर्थ्याअभावी देवबंदचे मुसलमान काँग्रेसचे सहकार्य मिळवू इच्छित होते. पुढील काळात विशेषतः इ.स. १९०९ नंतर भारताची फाळणी आणि पाकिस्तानची निर्मिती या दिशेने वेगाने वाटचाल सुरु झाली तेव्हा देवबंद चळवळीतून स्थापन झालेल्या जमियात-उल-उलेमा-हिन्द व अलिगड चळवळीतून उयास आलेल्या अखिल भारतीय मुस्लिम लिगचा प्रभाव वाढत गेला होता.

**तळटिपा**


१. शेषराव मोरे, अखंड भारत का नाकारला ? , राजहंस प्रकाशन ,पुणे,पृष्ठ क्रं.९४
२. The Deoband School and The Demand for Pakistan-Zial-ul-Hasan Faruqi, Asia pub. House Bombay page No. ४२
३. डॉ.अलीम वकील,मौलाना आझाद, प्रतिमा प्रकाशन,पुणे (२००५) पृष्ठ क्रं.३४३
४. History of Freedom Movment in India, vol-२ Tara chand , publications Division, Govt. of India,ND (१९९०) page No.३८२
५. Islamic Revival in British India: Deoband (१८६०-१९००) , Barbara . D. Metcalf ,OUP (२००२) page No.९१
६. Islamic Renaissance in south Asia (१७०७ -१८६७) ञAdam pub. And Dist ND (२००४) page No.२३४
७. The Deoband school and The Demang for Pakistan-Zil-ul-Hasan Faruqi, Asia pub. House Bombay(१९६३) page No.२५
८. The Deoband school and The Demang for Pakistan-Zil-ul-Hasan Faruqi, Asia pub. House Bombay(१९६३) page No.४३
९. British paramountcy and Indian Renissance ,part-I Ed.R.C.Mujumdar and others.Bharatiya vidya Bhavan,Bombay(१९९१) page No.३०४
१०. आधुनिक भारतातील मुस्लिम विचारवंत,फक्रुद्दीन बेन्नूर, भूमी प्रकाशन,लातूर (२००७) पृष्ठ क्रं.४०